# मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नवीन अधिकृत शिधावाटप दुकान (रेशन शॉप) उघडण्यासाठी जाहिरात

शासनामार्फत मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात खालील प्राथम्यक्रमानुसार एकुण ७७७ ठिकाणी नवीन अधिकृत शिधावाटप दुकाने मंजुर करावयाची आहेत.

१) पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था) २) नोंदणीकृत स्वंयसहायता बचत गट ३) नोंदणीकृत सहकारी संस्था ४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था ५) महिला स्वयंसहायता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था.

ज्या विभागात दुकाने उघडावयाचे आहेत त्याचा परिमंडळनिहाय तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | विभागीय परिमंडळ | कार्यालयाचे नाव व पत्ता | नविन उघडण्यात यावयाच्या अधिकृत शिधावाटप दुकानांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | अ | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,<br>पुरवठा भवन,५ वा मजला,जनरल नागेश मार्ग,महात्मा गांधी रुग्णालयाजवळ (बैलघोडा) परळ,मुंबई -१२<br>दुरध्वनी क्रमांक -०२२-२४१५७५९२,२४१५७५६० | २४३ |
| २. | ड | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,<br>बिलावा भवन,नेहरु मार्ग,सांताक्रूज (पुर्व) मुंबई -५५<br>दुरध्वनी क्रमांक-०२२-२६१२३६१७ (शि.का.क्र.२३/ड) | १३० |
| ३. | ई | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,<br>पहिला मजला,चंचलस्मृती, ग.द.आंबेकर मार्ग, नायगाव क्रॉस रोड,वडाळा, मुंबई-३१<br>दुरध्वनी क्रमांक-०२२-२४१२५४९५,२४१२५३५२ | १४९ |
| ४. | फ | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,<br>आरामबाग ईस्टेट,विर सावरकर मार्ग,ठाणे (प)<br>दुरध्वनी क्रमांक-०२२-२५३३२६४८,२५३३२६५७ | १९२ |
| ५. | ग | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,<br>कांदिवली हितवर्धक मंडळ,एस.व्ही.रोड, कांदिवली (प) मुंबई-<br>दुरध्वनी क्रमांक-०२२-२८०७०१२३ | ६३ |

शिधावाटप दुकान मंजुरीबाबत शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या अटी/शर्ती,चतु:सिमा इ.चा संपुर्ण तपशील संबंधित विभागाच्या परिमंडळ कार्यालयात तसेच संबंधित शिधावाटप कार्यालयात उपलब्ध आहे. ही जाहीरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत विहीत नमून्यात अर्ज संबंधित परिमंडळ कार्यालयातुन प्राप्त करुन आवश्यक त्या कागदपत्रासह परिमंडळ कार्यालयात सादर करावे.

इच्छुक संस्था/स्वंयसहायता गट यांनी अधिक माहितीसाठी संबंधित कार्यालयाशी सपंर्क साधावा. सदर जाहिरात **www.controllerofrationing-mumbai.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**(सुधाकर तेलंग, भा.प्र.से.)**
**नियंत्रक शिधावाटप व**
**संचालक नागरी पुरवठा,**
**मुंबई.**

## मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात अधिकृत शिधावाटप दुकान (रेशन शॉप) उघडण्यासाठी जाहिरात

शासनामार्फत मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रात अतिरीक्त एकांक असलेल्या तसेच बंद दुकानाच्या विभागासाठी एकुण ७७७ ठिकाणी नविन शिधावाटप दुकान मंजुर करण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. इच्छुक पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांचे कडून त्यासाठी खालील अटीवर अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. अर्जदाराच्या प्रस्तावित दुकानाची जागा किमान १०० चौ.फू.(९.२९१ चौ.मि.) क्षेत्रफळाची व विभागासाठी घोषित केलेल्या चतु:सिमेत असावी. त्याकरिता आवेदनासोबत जागेचे हमीपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

२. प्रस्तावित जागा व्यावसायीक असावी असे बंधनकारक नाही. निवासी जागेतही शिधावाटप दुकान मंजूरीचा विचार होईल, मात्र ती पक्क्या बांधकामाची असावी. ज्या अर्जदारास दुकान मंजूर होईल त्या अर्जदाराने दुकान मंजूर झाल्यानंतर प्रस्तावित जागेचे कागदपत्रे दुकान मंजूर झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा दुकान मंजूरीचे आदेश रद्द करण्यात येतील. तसेच संबधित गृहनिर्माण संस्था अगर तत्सम प्राधिकारणाचे निवासी जागेतील शिधावाटप दुकानासाठी ना हरकत पत्र सादर करावयास हवे. स्वमालकीची जागा असणाऱ्या व १०० चौ.फू. पेक्षा मोठी जागा असणाऱ्या अर्जदारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

३. जागेचे करारपत्र, सत्य प्रतिज्ञापत्र यासारखे तत्सम कागदपत्रे स्वयंसाक्षांकीत करून सादर करावेत. ज्या अर्जदारास दुकान मंजूर होईल त्यास जागेचे करारपत्र नोंदणीकृत (Registered) करुन सादर करावे लागेल. अर्जासमवेत पुरावादर्शक सादर करावयाची सर्व कागदपत्रं तसेच काही फेरफार करणे आवश्यक असल्यास असे फेरफार अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंतच स्विकारले जातील (जाहिरात वर्तमान पत्रातून प्रसिध्द झाल्याचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत) त्यानंतर असे कोणतेही फेरफार करता येणार नाहीत किंवा सुधारीत कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत व ग्राहय धरले जाणार नाहीत. ऑफलाईन अर्ज हे संबंधित परिमंडळ कार्यालयामध्ये साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून निश्चित केलेल्या अंतिम तारखेपर्यंत कार्यालयीन वेळेतच स्विकारल्या जातील.

४. दुकानाची जागा विभागातील शिधापत्रिकाधारकांना व वाहतुकीच्या दृष्टीने सोयीची असली पाहिजे. तसेच प्रस्तावित जागेचे बांधकाम अनधिकृत नसावे. दुकानाची प्रस्तावित केलेली जागी अनधिकृत असल्याचे कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी ठोस दिसून आल्यास संबंधित अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्यात येईल.

५. या जाहिरातीद्वारे दुकान मंजुर होणाऱ्या आवेदकास दुकानासाठी दर्शविलेल्या जागेसंबंधी/बांधकामाच्या वैधतेसंबंधी/ इतर तत्सम बाबींसबंधी भविष्यात कोणत्याही स्थानिक प्राधिकारणाच्या नियमांचा/क्रेंद्र शासनाच्या कायद्यांचा भंग झाल्यास दुकान विनाविलंब/ विनानोटीस रद्द करण्यात येईल असे शपथपत्र देणे आवश्यक आहे.तसेच दुकान मंजुर करण्यापुर्वी ही अट मान्य असल्याचे शपथपत्र ही त्यास द्यावे लागेल किंवा स्थानिक प्राधिकारणाचे ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल.

६. पंचायत ( ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था )/ नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या

कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारीसंस्था यांना दुकानाचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदयाद्वारे करणे आवश्यक राहील.

७. पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांचें नावे बँकेत खाते असणे व त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक असुन अर्जदाराकडे खेळते भांडवल किमान रु. ५०,०००/- असावे. आर्थिक स्थितीची पुरावादर्शक कागदपत्रे उदा.बँक खाते, पतपेढीचे हमीपत्र इत्यादी जाहिरातीच्या अंतिम दिनांकापुर्वीची असावी. वैयक्तिक हमीपत्र आर्थिक स्थितीचा पुरावा म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.

८. पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांचे मान्यतेबाबतचे संबंधित प्राधिकारणाचे नोंदणी प्रमाणपत्र/प्रमाणपत्र/पत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहायता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था मागील ३ वर्षांचा लेखा परिक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे. बचत गटाचे मागील वित्तिय वर्षाच्या सभेचे इतिवृत्त सादर करणे आवश्यक राहिल.

१०. पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहायता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्थाचे पदाधिकाऱ्याच्या नेमणुकीबाबतच्या ठरावाची प्रत तसेच बचत गटाच्या सदस्यांची यादी पदाधिकाऱ्याचे नाव,छायाचित्र व पत्त्यासह देणे आवश्यक आहे.

११. पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांचे नावे अन्य शिधावाटप दुकान कार्यरत असल्यास ते आणखी एक शिधावाटप दुकान मिळण्यास पात्र नसल्याने त्यांनी आवेदनपत्र सादर करु नयेत. तसेच ज्या उपरोक्त नमुद संस्था/ स्वयंसहय्यता गटाचे दुकानावर जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ च्या अधिनियमानुसार गुन्हा दाखल झाला असेल किंवा गैरव्यवहारामुळे निलंबित/रद्य करण्यात आले असेल अशा उपरोक्त नमुद संस्था/स्वयंसहायता गटांना नवीन दुकानासाठी आवेदनपत्रे सादर करु नयेत.

१२. उपरोक्त अटींबाबतची पूर्तता करतेवेळी अर्जदाराने बनावट कागदपत्रं/खोटी माहिती सादर केली होती असे उघडकीस आल्यास त्यांचे दुकान विनानोटीस रद्य करण्यात येईल.

१३. पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांचे पदाधिकार/सदस्यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी नसल्याबाबत व त्याचेविरुध्द जीवनावश्क वस्तु कायदा १९५५ नुसार गुन्हा दाखल नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर करावे.

१४.अर्ज सादर करतानाच अर्जासोबत दुकान अटींची पूर्तता करणारी कागदपत्रे देणे बंधनकारक आहे.

वरील अटी पूर्ण करण्याऱ्या अर्जदारानी विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित विभागीय परिमंडळ कार्यालयाकडुन रु.५/-(रुपये पाच फक्त) भरुन प्राप्त करावे. अर्जदार पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)/नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट/नोंदणीकृत सहकारी संस्था/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था/महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांनी आवेदनपत्रातील संपर्ण तपशील अचुक भरावा. व आवश्यक त्या पुरावादर्शक कागदपत्रासह अर्ज दोन प्रतीमध्ये (एक फोटो प्रत) संबंधीत परिमंडळ कार्यालयात जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत सादर करावेत.

ज्या विभागात नव्याने शिधावाटप दुकाने उघडावयाची आहेत त्या विभागातील स्थानिक शिधावाटप कार्यालय क्रमांक,परिमंडळ कार्यालयाचा पत्ता व घोषित ठिकाणांची एकूण संख्या इत्यादींचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ .क्र | विभागीय परिमंडळ | विभागीय परिमंडळ कार्यालयाचा पत्ता | स्थानिक शिधावाटप कार्यालय क्रमाक | घोषित ठिकांणाची एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | अ | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, पुरवठा भवन,५ वा मजला,जनरल नागेश मार्ग,महात्मा गांधी रुग्णालयाजवळ (बैलघोडा) परळ, मुंबई -१२<br>दुरध्वनी क्रमांक -२४१५७५७९,२४१५७५६० | १/अ, ३/अ, ५/अ, ६/अ, ९/अ, ११/अ, १३/अ, १५/अ १६/अ, १७/अ, १८/अ, १९/अ, २०/अ, २१/अ. | २४३ |
| २. | ड | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, बिलावा भवन,नेहरु मार्ग,सांताक्रूज (पुर्व) मुंबई-५५ दुरध्वनी क्रमांक-२६१२३६१७ (शि.का.क्र.२३/ड) | २२/ड, २३/ड, २४/ड, २५/ड, २६/ड, २९/ड. | १३० |
| ३. | ई | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, पहिला मजला,चंचलस्मृती, ग.द.आंबेकर मार्ग, नायगाव क्रॉस रोड,वडाळा, मुंबई-३१<br>दुरध्वनी क्रमांक-२४१२५४९५,२४१२५३५२ | ३०/ई, ३१/ई, ३२/ई, ३३/ई, ३४/ई, ३५/ई, ४४/ई, ४५/ई. | १४९ |
| ४ . | फ | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, आरामबाग ईस्टेट,विर सावरकर मार्ग,ठाणे (प) दुरध्वनी क्रमांक-२५३३२६४८,२५३३२६५७ | ३६/फ, ३७/फ, ३८/फ, ३९/फ (मु), ३९/फ (उ), ४०/फ (मु), ४०/फ (उ), ४१/फ(ठाणे),४१/फ(वाशी), ४१/फ(भाईंदर), ४६/फ(अंबरनाथ), ४८/फ. | १९२ |
| ५. | ग | उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, कांदिवली हितवर्धक मंडळ एस.व्ही.रोड, कांदिवली (प) मुंबई-<br>दुरध्वनी क्रमांक-२८०७०११५४,२८०७०१२३ | २७/ग, २८/ग, ४२/ग, ४३/ग, ४७/ग. | ६३ |

ज्या विभागात शिधावाटप दुकाने मंजुर करावयाची आहेत त्या विभागाची नावे विभागाच्या चतु:सिमा व संबंधित बाब क्रमांक याबाबतचा तपशिल दर्शविणारी यादी या पत्रकासोबत जोडली आहे.जाहिरातीत प्रसिध्द झालेल्या विभागात शिधावाटप दुकान मंजुरीसाठी यापुर्वी कोणी अर्ज केला असल्यास ते नामंजुर झालेले आहेत असे समजण्यात यावे. शासनाने निश्चित केलेल्या अटी/शर्तीनुसार पात्र ठरणाऱ्या अर्जदारांना शिधावाटप दुकाने मंजुर करण्यात येतील.

कोणतीही एक बाब किंवा अनेक बाबींचा जाहिरनामा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी राखुन ठेवला आहे.

सदर जाहिरात **www.controllerofrationing-mumbai.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**(सुधाकर तेलंग, भा.प्र.से.)**
**नियंत्रक शिधावाटप व**
**संचालक नागरी पुरवठा,**
**मुंबई.**

क्र.निशि/दुकान/९/का.वि./प्र.क्र.२३/२०२४/जा. २६०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय
रॉयल इन्शुरन्स इमारत,
चर्चगेट,मुंबई -४०० ०२०
दिनांक :- २८|८|2024

प्रत :-

१) सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांना प्रस्तावाच्या यादीसह अग्रेषित (दोन प्रती)
सदर यादीची एक प्रत कार्यालयात दर्शनी जागी जनतेच्या माहितीसाठी लावावी.तसेच अर्ज विक्री व स्विकारण्यासाठी परिमंडळ कार्यालयात स्वतंत्र व्यवस्था करावी.अर्ज विक्री करतांना ते कोणत्या विभागासाठी देण्यात येत आहे त्याचा बाब क्रमांक अर्जावर स्पष्टपणे नमुद करावा.या जाहिरातीस जास्तीतजास्त प्रसिध्दी मिळावी या दृष्टीने आपल्या स्तरावर प्रयत्न करावे.

२) शिधावाटप अधिकारी,सर्व शिधावाटप कार्यालये यांना प्रस्तावाच्या यादीसह अग्रेषित. या जाहिरातीस जास्तीतजास्त प्रसिध्दी मिळावी या दृष्टीने आपल्या स्तरावर प्रयत्न करावे.

३) सर्व उपनियंत्रक शिधावाटप व कार्यासन अधिकारी, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी.

४) कार्यासन अधिकारी,कार्यासन क्रमांक २१,२३,२८ व ३१,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना प्रस्तावाच्या यादीसह अग्रेषित.

५) मा. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे स्वीय सहायक (दोन प्रती)

६) मा. मंत्री महोदयांचे खाजगी सचिव,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांना सस्नेह सादर.